03 JUN 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



**स्टार्टअप : संधी उज्वल भविष्याची**

भाग - १

# नावीन्यपूर्ण कल्पनेला मिळाली रोजगाराची जोड

## विद्यापीठात ६५ स्टार्टअप : आठ स्टार्टअपना सव्वादोन कोटींची मदत

**ज्यांच्याकडे नावीन्यपूर्ण कल्पना, नवीन काहीतरी शोधण्याची जिज्ञासा आहे, अशांना आजही उत्तुंग यश घ्यायला शासन हातभार लावते. केवळ व्यवसाय धंदा म्हणून नव्हे, तर नवीन कल्पना प्रत्यक्षात रोजगारात आणून दाखवणाऱ्यालाच या स्टार्टअपमध्ये सहभाग मिळतो. केंद्र शासनाने स्टार्टअप ही योजना २०१६ मध्ये जाहीर केली. याचा लाभ अनेकांनी घेत प्रगती साधली आहे. या पार्श्वभूमीवर याचा वेध घेणारी मालिका आजपासून...**

**लुमाकांत नलवडे :**
**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २ : जिल्ह्यात केवळ शिवाजी विद्यापीठात ६५ हून अधिक स्टार्टअपची नोंदणी असून, ४० हून अधिक नोंदणी प्रक्रियेत आहेत. आजपर्यंत आठ प्रकल्पांना दोन कोटी ३५ लाखांहून अधिक बीज भांडवल आणि अर्थसाहाय्य झाले आहे. नावीन्यपूर्ण कल्पना सूचवा, त्यासाठी केंद्र शासनाकडून मदत, अनुदान, कर्ज घ्या आणि तुमचा व्यवसाय सुरू करा. 'नोकरी मागू नका, नोकरी द्या' असा संदेश स्टार्टअप योजनेने दिला आहे.

> शिवाजी विद्यापीठातील एकाच स्टार्टअप केंद्रामध्ये आठ नावीन्यपूर्ण स्टार्टअप सुरू झाले असून, त्यासाठी शासनाकडून दोन कोटी ३५ लाख रुपयांची मदत मिळाली आहे. हा शिवाजी विद्यापीठाचा गौरव आहे. विद्यार्थी, शिक्षकांनी नोकरी देणारे बनावे हाच स्टार्टअपचा उद्देश आहे आणि तो शिवाजी विद्यापीठांमध्ये यशस्वी होत असल्याचे दिसते. तरुणांनी स्टार्टअपकडे वळावे. अनेक हातांना काम द्यावे यासाठी आम्ही मार्गदर्शनासाठी तयार आहोत.
> **- प्रा. पी. डी. राऊत, स्टार्टअप विभागप्रमुख**



### संकल्पना हवी नावीन्यपूर्ण

तुमची नावीन्यपूर्ण कल्पना स्टार्टअप केंद्रात दिल्यानंतर तुम्हाला त्या संदर्भात मोफत मार्गदर्शन केले जाते. तुमच्या संकल्पनेला तांत्रिक बाबींचे सहकार्य दिले जाते. कंपनी निर्माण करण्यापासून शासनाची मदत, अनुदान मिळवण्यापर्यंत सर्व काही सहकार्य केले जाते. केवळ आपली संकल्पना नावीन्यपूर्ण असणे आवश्यक आहे. त्यामुळे एखादी समस्या निकाली निघाली पाहिजे.

### दुधाचा दर्जा दर्शवणारे 'किट'

कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादनात समृद्ध आहे. या दूध व्यवसायात ग्रामीण भागातील डेअरीतून पुढे संघाच्या प्रकल्पापर्यंत जाणाऱ्या दुधाच्या दर्जावर परिणाम होऊ नये, असा स्टार्टअप शिवाजी विद्यापीठातील केंद्रात तयार झाला आहे.

हे एक किट आहे. वाहतूक करणाऱ्या टँकरला बसविल्यास ग्रामीण भागातील डेअरीतील दुधाचा दर्जा आणि प्रत्यक्षात प्रकल्पात दूध पोहोचल्यानंतर त्याचा दर्जा काय आहे, हे दर्शवितो. हे किट ऑनलाईनद्वारे याची माहिती दुधाच्या प्रकल्पावर दाखविते. त्यामुळे दुधात होणारी भेसळ रोखली जाऊ शकते. सध्या या कल्पनेला स्टार्टअपमध्ये स्थान मिळाले आहे. या नावीन्यपूर्ण कल्पनेला शासनाकडून बीज भांडवलासह मार्गदर्शन आणि सहकार्य मिळाले आहे. सध्या कोल्हापुरातील एका नामांकित दूध संघाच्या प्रकल्पात याचा उपयोग केला जातो.

**स्टार्टअपसाठी...**

१ आपल्याला सहभागी व्हायचे असेल तर समितीकडे अर्ज दाखल करावा लागतो.

२ समितीला तुमची कल्पना नावीन्यपूर्ण कशी आहे, यातून काय फायदा होणार आहे, याची माहिती द्यावी लागते.

३ यातून चाळणी पद्धतीने तुमचा प्रकल्प योग्य असल्यास तुम्हाला बीज भांडवल म्हणून परत न करावी लागणारी लाखो रुपयांची मदत मिळू शकते.

४ कंपनी स्थापन करावी लागते. कंपनीसाठी पहिल्या तीन वर्षाला इन्कम टॅक्स माफ केला जातो.

५ उद्योग उभारणीसाठी लाखो, कोटी रुपयांचे अनुदान आणि मदतही मिळते.

६ शेती, उद्योग, खाद्य, आरोग्य, डेअरी अशा कोणत्याही माध्यमातून योजनेत सहभागी होता येते.

७ समाजात काय समस्या आहेत, त्या सोडविण्यासाठी स्टार्टअप कसा उपयोगी पडेल, हे पटवून द्यावे लागते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 JUN 2025
पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या परीक्षेस २२ हजार विद्यार्थी हजर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी ७३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने १९० परीक्षा केंद्रांवर सुरळीतपणे पार पडल्या. या परीक्षांसाठी २२ हजार २६८ विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 JUN 2025

तरुण भारत

# ३५२ अभ्यासक्रमांचे विद्यापीठांतर्गत निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठांतर्गत मार्च-एप्रिल २०२५ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युतरच्या परीक्षा सुरु आहेत. सोमवारी बीए, बीएस्सी, एमबीए, फार्मा डी, डिप्लोमा इन इन्स्ट्रूमेन्टल मुझिक, डिप्लोमा इन टॅक्सेशन, पीजी डिप्लोमा इन इंटरनॅशन रिलेशन ॲण्ड सिक्युरिटी स्टडीज, डिप्लोमा इन बँकिंग ॲण्ड फायनान्स अशा ७५ अभ्यासक्रमाची ७२ परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरळीत पार पडली. २२ हजार २६८ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. आतापर्यंत झालेल्या परीक्षापैकी ३५२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले. त्यामुळे विद्यार्थ्यांचा पुढील शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे.